ग्रामिण भागात शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडित होण्याचा प्रश्न सोडविणार

आ.अनिल पाटील यांची शेतकरी बांधवाच्या शिष्टमंडळास ग्वाही

अमळनेर : तालुक्यातील ग्रामिण भागातील ढेकु, हेडावे, सारबेटे, संदरपट्टी, एकरुखी, जुनोणे, सडावण, रामेश्वर, पळासदळे, खोकरपाट, बहादरवाडी आणि परिसरातील गावातील शेती पंपाचा विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने शेतकरी बांधवाच्या शिष्टमंडळाने आ. अनिल पाटील यांच्याकडे धाव घेऊन निवेदन दिले.

यावेळी आमदारांनी वरील सर्व गावांच्या शेतकरी बांधवांच्या व्यथा जाणून घेत महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली व लवकरच हा प्रश्न सोडवून शेतकरी बांधवाना दिलासा दिला जाईल अशी ग्वाही दिली.

दरम्यान यावेळी शेतकरी बांधवानी आमदारांना निवेदन दिले, यात म्हटले आहे की, आमचे शेतकऱ्यांच भांडवल व पोट भरण्याचे साधन म्हणजे शेती असून शेती करण्यासाठी पाण्यासाठी विजेची गरज पडते. विद्युत वितरण मंडळाने आम्हाला ८ तास विज पुरविण्याचे सांगितले आहे. परंतु दिवसातुन मागुन २ ते ३ तास विद्युत पुरवठा केला जातो. के.व्ही विद्युत पुरवठा डीम असतो, सिंगल फेज असते. लाईट पुन्हा-पुन्हा जा-ये करते.

त्यामुळे काबाळकष्ट करुन मेहनतीने उभे केलेले पिक तोंडाशी घास देवून देखील मिळत नाही. तरी सदर विद्युत पुरवठा सुरळीत करण्यात यावा. आणि आम्हाला योग्य ता न्याय मिळावा अशी विनंती यात करण्यात आली आहे.

सदर निवेदनाच्या प्रती महावितरणच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही देण्यात आल्या आहेत. सदर शिष्टमंडळात प्रा.सुरेश पाटील, डॉ.किरण पाटील, संदेश पाटील, निळकंठ पाटील, बाळू पाटील, युवराज पाटील, इब्राहम हतिफ, रज्जब खा इस्माईल खा, हरून खा मुमताज खा, भैय्यासाहेब पाटील, विश्वास पाटील, अधिकार पाटील, लोटण पाटील, पंकज पाटील, प्रविण पाटील, गणेश वंजारी, भास्कर पाटील, अशोक पाटील, नितिन पाटील, महारू पाटील उपस्थित होते.

कर्जाणे, देवझीरी आश्रमशाळांना डॉ. चंद्रकांत बारेला यांची भेट

देवझीरी शासकीय आश्रमशाळचे अवस्था दयनीय

चोपडा : आदिवासी प्रकल्प समितीचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत बारेला यांनी नुकतीच कर्जाणे, देवझीरी आदिवासी आश्रम शाळांना भेटी देऊन पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात कर्जाणे येथील अनुदानित आश्रम शाळेची व्यवस्था उत्तम तर, देवझीरी येथील शासकीय आश्रमशाळेची अवस्था अत्यंत दयनिय असल्याचे निदर्शनास आले असून देवझिरी आश्रमशाळेचा अहवाल आपण लवकरच आदिवासी विकास मंत्री के.सी.पाडवी यांना पाठवणार असल्याचे डॉ.चंद्रकांत बारेला यांनी सांगितले.

कर्जाणे येथील आश्रमशाळेत विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या समाधान कारक होती. जेवणाची व्यवस्था चांगली होती तर, देवझीरी शासकीय आश्रमशाळेला भेट दिली असता तिथं शिक्षणाचा खेळ - खंडोबा झालेला

बघायला मिळाला. शिक्षक,विद्यार्थी अधिक्षिका कुणीही ठिकाणावर नव्हते. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, स्वयंपाकी, विना परवानगी सुट्टी टाकून दांड्या मारत असतात, कधीतरी एकत्र येऊन मस्टरवर सह्या करतात मुलींचे मुलांचे वसतीगृह बंद असून भोजन व्यवस्था शासकीय नियमा नुसार नाही, शिक्षण साहीत्य, पुस्तके कपाटात धूळ खात पडलेले असून ते मुलांना वाटप केले गेले नाही. यावल प्रकल्प कार्यालयाकडून शाळे साठी संगणक देण्यात आले आहे, मात्र शाळेत संगणक नाही, मग गेले कुठे ? असा संतप्त सवाल डॉ.बारेला यांनी यावेळी विचारला. शाळेचे मुख्याध्यापक सुनील चौधरी, अधीक्षक सुनील गढे यांच्या मनमानी कारभाराला पालक, विद्यार्थी कंटाळले असून शाळेचा ८० टक्के सामान हेच घरी घेऊन जात असल्याचा आरोप पालकांनी केला.

मुख्याध्यापक सुनील चौधरी यांनी शाळेत कहर माजवला असल्याचे यावेळी लक्षात आले. त्यांची योग्य त्या ठिकाणी तक्रार करण्यात येऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी आपण करणार असल्याचे डॉ. बारेला यांनी सांगितले.

बांधकाम बंद करण्याचे आदेश

शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी सुमारे ८० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्या दुरुस्तीचे काम अत्यंत निष्कृष्ट दर्जाचे सुरू आहे. ८० लाखात संपूर्ण इमारत नवीन बांधून तयार होऊ शकते, मात्र दुरुस्ती सुध्दा चांगल्या पध्दतीने करण्यात येत नाही याबद्दल नाराजी व्यक्त करीत सदरचे बांधकाम त्वरित बंद करावे असे आदेश डॉ. चंद्रकांत बारेला यांनी दिले असून, लवकरच संबंधित खात्याचे वरिष्ठ अधिकारी यांना बोलावून क्वालिटी कंट्रोल मार्फत तपासणी व चौकशी करण्यात येणार असल्याचेही डॉ. बारेला यांनी सांगितले.

किनगाव इंग्लिश निवासी स्कुलमध्ये १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

यावलः किनगाव येथील इंग्लिश मेडीयम निवासी पब्लिक स्कुलच्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थी विद्यार्थीनींचा निरोप समारंभाचा कार्येक्रम नुकताच स्कुलच्या सभागृहात झाला.या कार्येक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन विजयकुमार देवचंद पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून केंन्द्र प्रमुख प्रदीप सोनवणे हे होते.

यावेळी स्कुलचे सचिव व स्व.केतनदादा मल्टीपर्पज फाऊंडेशनचे अध्यक्ष मनिष विजयकुमार पाटील,पुनम पाटील, प्रथमिक विभागाचे मुख्याध्यापक अशोक पाटील,माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संजय उधोजी इ.उपस्थीत होते तर या कार्येक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोहिणी उधोजी,दिनकर पाटील, अरविंद सोनकुसरे,शाहरुख खान,रश्मी शेख, मिलिंद भालेराव,गोपाल चित्ते,दिलीप संगेले, राजश्री अहिरराव,संपत पावरा,हर्षल मोरे,सुहास भालेराव,वैशाली धांडे,भारती साठे,पवन महाजन,अनिल बारेला,सुनील चौधरी,भावना चोपडे,देवयानी साळुंखे,प्रतिभा धनगर,तुषार धांडे,नेहा धांडे, योगीता बिहारी बाळासाहेब पाटील इ.शिक्षकांचे सहकार्ये मिळाले.या कार्येक्रमाचे सुत्रसंचालन इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांनी केले.

'सेट' पाठोपाठ सीएस परीक्षेत वीणा नारखेडे यांचे यश!

जळगाव :भारतीय कंपनी सचिव संस्थानतर्फे झालेल्या कंपनी सेक्रेटरी प्रोफेशनल लेव्हल (सी. एस) परीक्षेत वीणा सुहास नारखेडे यांनी यश संपादन केले आहे. वीणा यांनी कंपनी सेक्रेटरी हा कोर्स कोरोनाच्या विपरित काळात स्वयं अध्ययनाच्या माध्यमातून यशस्वीपणे पूर्ण केला, हे विशेष.

तत्पूर्वी पार पडलेल्या महाराष्ट्र सेट परीक्षेतही वीणा यांनी पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले आहे. वीणा या दहावी (९६ टक्के) आणि बारावी बोर्ड परीक्षेत देखील गुणवत्ता यादीत चमकल्या होत्या. बारावीत वाणिज्य विभागातून त्या संपूर्ण बोर्डात प्रथम आल्या होत्या. आरआर विद्यालयातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनीच बहुमानही त्यांनी मिळविला आहे. सीएस परीक्षेसाठीच्या स्वयंअध्ययनात त्यांना सीए पदम पाटील आणि सीए करण काबरा यांचे मार्गर्शन लाभले.

ना. उदय सामंत यांना निवेदन

पारोळा : 'उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपल्या दारी' या सदराखाली उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आपल्या कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे दि.२६ रोजी भेट दिली. यावेळी विद्यापीठ स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे म्हणणे ऐकून निवेदन स्वीकारले. यात पारोळा येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचे व समस्यांचे निवेदन उदय सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय महाराष्ट्र राज्य) यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील यांनी दिले. या कार्यक्रमात मंत्र्याबरोबर पालक मंत्री ना. गुलाबराव पाटील, प्रधान सचिव रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, जिल्हाधिकारी, लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

श्रीराम नगर भागातून ट्रॅक्टर ट्रॉली चोरीला

चोपडा : शहरातील श्रीराम नगर भागातील राहत्या घरी लावलेले प्रतीक साहेबराव अहिरे व गुरुदास साहेबराव पाटील यांच्या मालकीचे सहा लाख किंमतीचे ट्रॅक्टर व ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

प्रतीक अहिरे (चोपडा) यांच्या मालकीचे स्वराज कंपनीचे ट्रॅक्टर (एम.एच.१९-२६७५) होते. त्यांच्याकडे ट्रॉली नसल्याने ते मित्र गुरुदास पाटील (श्रीराम नगर, चोपडा) यांची ट्रॉली व्यवसायासाठी वापरत होते. ट्रॅक्टर आणि ट्रॉली गुरुदास पाटील यांच्या राहत्या घरी लावलेली होती. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी घराजवळ लावलेले ट्रॅक्टर ट्रॉली दिसून आले नाही. अहिरे व पाटील या दोघांनीही शहा निशा केली असता ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याचे लक्षात आले. प्रतीक अहिरे यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धरणगावच्या नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी

अमळनेर : जिल्ह्यातील धरणगाव येथे तेली समाजाच्या दोन अल्पवयीन मुलींवर चंदूलाल मराठे नामक नराधमाने लैंगिक अत्याचार केला. ही घटना समाजमनाला काळीमा फासणारी असून येथील तेली पंच मंडळ, महिला मंडळ, नवयुवक तेली मंडळ यांच्यावतीने घटनेचा निषेध करण्यात आला. तर नराधमाला फाशी शिक्षा द्यावी, अशा आशयाच्या मागणीचे

निवेदन प्रांताधिकारी सीमा अहिरे यांना सोपविण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने तेली समाज बांधव, महिला व युवक उपस्थित होते.

चिंचोली विद्यालयात दहावी बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

चिंचोली ता यावलः सार्वजनिक माध्य. व उच्च माध्य येथे दि.२५ रोजी इयत्ता १० वी व १२ वीं विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाचा कार्यक्रम झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष फैजपूर पोलिस उपविभागीय अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांनी स्पर्धा परीक्षेविषयी मुलांना मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी मुलांच्या मनातील परीक्षेची भीती तसेच इंग्रजी विषयाचा न्यूनगंड दूर करण्यासाठी त्यांनी टीप्स दिल्या . तसेच अनुक्रमांक आणि परीक्षेतील गुण यांचे व्यावहारिक महत्त्व सध्या काय आहे हे पटवून सांगण्याचा प्रयत्न केला .दहावी आणि बारावी नंतर कोणत्या संधी आहेत, त्यांचा अभ्यासक्रम कोणता, विविध करिअर क्षेत्र याची थोडक्यात माहिती सांगितली, परीक्षा हॉलमधली मानसिकता ,स्वतःवरचा विश्वास या सगळ्या बाबी समजून सांगून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न ही केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे,तसेच प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक प्रदिप सोळुंके,तसेच संदीप सोनवणे (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक) प्रदीपकुमार सोनवणे (केंद्रप्रमुख, डांभुर्णी केंद्र) व शालेय समिती चेअरमन अनिल दंगलराव साठे , चिंचोली विकासो चेअरमन पंढरीनाथ कोळी , उंटावद विकासो चेअरमन शशिकांत पाटील , उच्च माध्यमिक व्यवसाय विभागाचा इलेक्ट्रिक टेक्नॉलॉजी विभागाचा माजी विद्यार्थी यशस्वी उद्योजक (रेशीम उद्योग) श्री समाधान पाटील किनगाव, गावातील प्रतिष्ठित नागरिक , विविध राजकीय , सामाजिक , शैक्षणिक संस्थेचे पदाधिकारी, ग्रामस्थ , मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन ही केले. या कार्यक्रमात विद्यालयाचे प्राचार्य श्री पी. जी. शिंदे , पर्यवेक्षक ए. एफ. पाटील व इतर शिक्षक-शिक्षकेतर बंधू-भगिनी-विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आर. पी. रावते यांनी केले.

विश्व हिंदू परिषदेतर्फे निवेदन

अमळनेर : कर्नाटक राज्यातील शिमोगा येथे हर्षा नामक कार्यकर्त्यांची निर्घुण हत्या करण्यात आली. ती अतिशय निंदनीय व निषेधार्यच आहे. ही हत्या विषारी व जिहादी मानसिकतेने पछाडलेल्या नेतृत्वांकडून जे विष अल्पसंख्यांक समाजात पेरले गेले त्याचा परिणाम आहे. अशी आमची स्पष्ट धारणा आहे. पॉपुलर फ्रंट ऑफ इंडिया, कॅम्पस फ्रंट ऑफ इंडिया व सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया या संघटनांनी जे विष पसरविण्याचे कार्य सुरु केलेले आहे. त्याचा परिणाम म्हणजे ही हत्या आहे. त्यामुळे त्यांच्यावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषदेतर्फे प्रशासनाकडे करण्यात आली आहे.

वर्डी येथे तडसाच्या पिल्लाला दिले जीवदान

वर्डी, ता. चोपडा : येथे जंगल परिसरात अफाट वृक्षतोड झाल्यामुळे त्याचे परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फटका मानवासह वन्य प्राण्यांना बसत आहे. जंगल परिसरात मानवाने केलेल्या अतिक्रमणामुळे वन्यप्राणी अन्न- पाण्याच्या शोधात गावपरिसरात येतात त्यापैकी वर्डी जंगल परिसरात सर्वात जास्त संख्येने पहावयास मिळणार प्राणी तडस आहे. गावाबाहेर मेलेले पाळीव प्राणी टाकले असल्याने ते सरळ गावाकडे येतात. अशातच गावाच्या उत्तरेला वर्डी हायस्कूलच्या मागे चारित, तरुणांना प्राण्याची आवाजाची चाहूल लागली, आलेल्या आवाजाच्या दिशेने शोध घेतला असता त्या ठिकाणी पाच ते सहा महिन्याचे मादी तडस जातीचे पिल्लू जखमी अवस्थेत आढळून आले. त्याला वाचवण्यासाठी उचलून त्यास पाणी व खायला दिले, असता ते खाऊ शकले नाही. तरुणांनी संबंधित वन कर्मचाऱ्यांना कळवून पुढील उपचारासाठी अडावद येथे हवलदार सुरवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू आहेत .

त्या पिल्लूला मानेखाली व पायाला दुखापत झाल्यामुळे ते चालू शकतात नव्हते. चार दिवस उपचारा अंती त्याला सोडण्यात येईल, असे वन कर्मचारी यांच्याकडून सांगण्यात आले. उमाकांत चव्हाण ग्रामपंचायत सदस्य, लखन पाटील, सागर शिंदे ,निलेश शिंदे, मनोज कुमार, सचिन धनगर, मनोज पाटील, विनायक पाटील, जयेश पाटील, पवन पाटील, ऋषिकेश पाटीलसह तरुणांनी सतर्क राहून तडस पिल्लूला वन कर्मचाऱ्यांच्या स्वाधीन केले.

प्रलंबित मागण्यासाठी कर्मचाऱ्यांचा संप

अमळनेर : शासकिय, निमशासकीय मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने प्रलंबित मागण्या संदर्भात संप पुकारला आहे. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने ह्या संपास पाठिंबा दर्शवला असून सहभागही नोंदवला आहे. आपल्या मागण्यांचे निवेदन संघटनेच्या वतीने प्रांताधिकारी यांना सोपविण्यात आले. दोन दिवसीय संप आहे. सन २००५ नंतर शासकीय सेवेत आलेल्या कर्मचार्यांना जुनी पेन्शन योजना लागु करावी ह्या महत्वाच्या मागणीचा विचार करुन तलाठी संवर्गात अशी पद भरती २००५ नंतर मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या संपाला पाठींबा देऊन सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला आहे, असे निवेदनात नमूद केले आहे.

ऑफर | घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी | ऑफर

APPOINTMENT

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

आता सवलतीच्या दरात

उत्तर महाराष्ट्र	रु. ३५००/-
मुंबईसह कोकण विभाग	रु. ३५००/-
मराठवाडा विभाग	रु. ३५००/-
पश्चिम महाराष्ट्र	रु. ३५००/-
विदर्भ	रु. ३५००/-
कोणतेही दोन विभाग	रु. ५०००/-
कोणतेही तीन विभाग	रु. ७७००/-
कोणतेही चार विभाग	रु. १०५००/-
संपुर्ण महाराष्ट्र	रु. १३०००/-

वरील जाहिरातीच्या रकमेवर 5% जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल.

स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी संपर्क TOLL FREE 18002081019

E-mail:customercare@sapp.in

कवी कुसुमाग्रज वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्त मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शन

जळगाव : येथील ए.टी.झांबरे माध्यमिक विद्यालय जळगाव येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंती निमित्त मराठी राजभाषा दिन व मराठी भाषा संवर्धन सप्ताह निमित्त मराठी साहित्य ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. सदरील प्रदर्शनाचे उदघाटन जळगाव महसूल विभाग तहसीलदार महेंद्र माळी व शाळेचे मुख्याध्यापक दिलीप कुमार चौधरी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रदर्शनात अध्यात्मिक साहित्य, ज्ञान कोश,विश्वकोश, बालसाहित्य,कवी कुसुमाग्रज यांचे साहित्य, परमपुज्य सानेगुरुजी,व.पु. काळे, शांता शेळके,वि.दा.करंदीकर इ.साहित्य मांडणी केली होती. सदरील प्रदर्शनाला विद्यार्थी

,शिक्षक व पालकांनी भेट दिली व अभिप्राय नोंदविला व मराठी साहित्य व साहित्यीकांविषयी माहिती जाणून घेतली. सदरील उपक्रमासाठी मुख्याध्यापक दिलीपकुमार चौधरी व पर्यवेक्षिका श्रीमती प्रणिता झांबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल श्रीमती.रोशनी बाविस्कर व बी.एड. आंतरवासिता छात्राध्यापक यांनी केले.उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कलाशिक्षक सतिष भोळे, आर. एन.तडवी , पराग राणे,श्रीमती प्रतिभा नेहते.इ. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी चंदन खरे, अशोक तायडे व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

शिरसमणी जि.प.शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

पारोळा : तालुक्यातील शिरसमणी येथील जि.प. शाळेत माजी सरपंच कै. तुकाराम नानाभाऊ यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त समता परिषदेचे तालुका अध्यक्ष संतोष महाजन यांच्या वतीने आदिवासी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

कै.तुकाराम तुळशीराम महाजन यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे पुत्र संतोष महाजन हे विविध उपक्रम राबवितात. यावर्षी जि. प. शाळेत आदिवासी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या पेन व शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. शिरसमणीचे सरपंच सतीश पाटील, माजी सरपंच रोहिदास पाटील, उपसरपंच दादाभाऊ पाटील, विकासोचे चेअरमन किशोर पाटील, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश पाटील, उपाध्यक्ष संभाजी पाटील व ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र पाटील, निंबा महाजन, भोला पाटील, गोरख भिल, युवराज गोपाळ, शांताराम महाजन, गोपाल महाजन, भाऊसाहेब पाटील, धिरज महाजन, समाधान पाटील, राजू पिंजारी, मुख्याध्यापक वसंत मोरे, शिक्षक रोहिदास पाटील, भटूसिंग गिरासे व मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी निखिल महाजन मोहन माळी, सुनील महाजन, तरुण व नागरिक मोठ्या संख्येने होते. संतोष महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भटूसिंग गिरासे यांनी तर, आभार भदाणे यांनी मानले.

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि., सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्ट कॉर्नर, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्सचा पहिला मजला, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव -४२५ ००१.

(नियम ८ (६) ची तरतूद पाहा)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना

प्रतिभूत हित (अंमलबजावणी) अधिनियम, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीसह वाचित प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्तांची पुनर्रचना आणि प्रतिभूत हित अंमलबजावणी कायदा, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

समस्त जनतेला आणि विशेषत्वाने कर्जदार आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंकडे तारण/प्रभारात असलेली खालील वर्णनाची स्थावर मालमत्ता, जी प्रतिभूत धनकोच्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रतीकात्मक ताब्यात घेतली आहे, ती ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' आधारावर खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/हमीदार/कायदेशीर वारसांची नावे कर्ज खाते क्र.	काही असल्यास, ज्ञात भारासह प्रतिभूत मत्तेचा तपशील	थकीत रक्कम	आरक्षित मूल्य (रुपयांत) / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	प्रमिला राजेंद्र जैन (कर्जदार) अक्षय राजेंद्र जैन (सहऋणको) ए आर जैन कॉटन कंपनी (सहऋणको) कर्ज खाते क्र. एनएचजीओके००००१०२२६५८	सर्व्हे क्र. ४४६ १, प्लॉट क्र. ८ आणि ९, आकार अपार्टमेंट, फ्लॅट क्र. २०, दुसरा मजला, जळगाव पीपल बँकेच्या समोर, महाबळ रोड, महाबळ मेन रोडलगत, जळगाव-४२५ ००४.	रु. ४२,५५,७०६/- (२३ फेब्रुवारी २०२२ रोजी अनुसार)	रु. ६७,६५,०००/- / रु. ६,७६,५००/-	२५ मार्च २०२२ स. ११.०० वा. ते दु. ०३.०० वा.	२९ मार्च २०२२ दु. ०२.०० वा. ते दु. ०३.०० वा.

ऑनलाइन लिलाव आमची लिलाव एजन्सी ऑक्शन टायगरच्या संकेतस्थळावर (URL Link-https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/) वर करण्यात येईल. गहाणदार/सूचना पाठविलेले यांना **२८ मार्च २०२२ रोजी सायं. ०५.०० वा.** पूर्वी पुढील व्याजासह संपूर्ण थकबाकी चुकती करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, अन्यथा सदर तारण मालमत्तेची परिशिष्टानुसार विक्री करण्यात येईल.

प्रस्तावित बोलीदारांनी इसारा रक्कम ठेव आरटीजीएस/धनकर्ष (डीडी) (रकाना ई पाहा) आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि., सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्सचा पहिला मजला, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव-४२५ ००१** येथे **२८ मार्च २०२२** रोजी किंवा तत्पूर्वी **दु. ०४.०० वा.** पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्या की, प्रस्तावित बोलीदार त्यांचे प्रस्ताव संकेतस्थळाद्वारे सादर करू शकत नसतील तर निविदा दस्तावेजाची स्वाक्षरित प्रत उपरोक्त नमूद वेळेनुसार आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि., सिटी सर्व्हे क्र. १९७६बी/१+२, इंडिया गॅरेज, साऊथ वेस्टर्न कॉर्नर, इंडिया प्लाझा कॉम्प्लेक्सचा पहिला मजला, जिल्हा पेठ, स्वातंत्र्य चौक, जळगाव-४२५ ००१** येथे **२८ मार्च २०२२** रोजी किंवा तत्पूर्वी **सायं. ०५.०० वा.** पूर्वी सादर करू शकतील. इसारा रक्कम ठेव धनाकर्ष/प्रदान आदेश ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.** '' यांच्या नावे **जळगाव** येथे देय स्वरूपात राष्ट्रीयीकृत/अनुसूचित बँकेकडील असावा.

निरीक्षण, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरण संबंधित अधिक स्पष्टीकरणासाठी, कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.** यांना **७०२१०७२८६९** वर संपर्क करा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही पुढील कारण न देता कोणत्याही किंवा सर्व बोली निरस्त करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया संकेतस्थळ https://www.icicihfc.com/ वर भेट द्या.

दिनांक : २७ फेब्रुवारी २०२२
ठिकाण : जळगाव

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड